MHKO050026202020

**नियमित दिवाणी दावा क्र.१७०/२०२० मधील**
**निशाणी २० खालील आदेश**
**सौ. लक्ष्मी गणेश संकपाळ वि.**
**श्री. राजू बापू पाटील वगैरे १**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्रं.२ यांनी त्यांचेविरुध्द झालेला "विना कैफियत'' आदेश रद्द होवून मिळणेसाठी व त्यांची कैफियत दावेत सामील करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्रं.२ यांनी आपल्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द दावा खरेदीपत्र रद्द करुन मागणीचा व कायम मनाई ताकिदीचा दाखल केला आहे. प्रतिवादी क्रं.२ या महिला आहेत. प्रतिवादी या उंडाळे या गावी विवाहनंतर नांदत आहेत व ते मे. न्यायालयापासून १०० कि.मी. अंतरावर आहे. कोव्हीड १९ या संसर्गजन्य रोगाचे प्रादुर्भावामुळे दाव्यावर सही करता आली नाही. तसेच समन्स व नोटीस लागू झालेनंतर प्रतिवादी नं.२ यांच्या आजारपणामुळे मुदतीत कैफियत देता आली नाही. वादी यांनी दाव्यामध्ये प्रतिवादी क्रं.२ यांना नामी पक्षकार म्हणुन नमुद केले आहे. प्रतिवादी क्रं.२ यांना ३६० इतक्या दिवसांचा विलंब माफ होऊन विना कैफियत आदेश रद्द होऊन प्रतिवादी क्रं. २ यांची कैफियत पटलावर घेण्याची विनंती केली आहे.

३. वादीने नि.२१ कडे अर्जास म्हणणे दाखल करुन हरकत नोंदविली. वादीने आपल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले की, सदर अर्जातील कथने वादींना मान्य व कबुल नाहीत. प्रतिवादी यांनी विलंबाचे कारण सुस्पष्टपणे नमुद नाही. निव्वळ लॉकडाऊनचा गैरफायदा प्रतिवादी यांना घेता येणार नाही. प्रतिवादी हे वादी यांचे कायदेशीर हक्कावर गदा आणुन वादी यांना त्रास देत आहेत व जाणुनबुजुन कैफियत

दाखल करणेस विलंब करित आहेत. त्यामुळे अर्ज खर्चासह नामंजुर करणेची विनंती केली.

४. दाव्याचे अवलोकन केले. उभय पक्षकारांतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द खरेदीपत्र रद्द होवून मिळणेकरिता व विवक्षित दादी मागणीचा दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्रं.२ ला कैफियत दाखल करण्याची संधी देवून त्याला बचाव करण्याची संधी देणे नैसर्गिक न्यायतत्वानुसार आवश्यक आहे. तसे केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी, प्रतिवादी क्रं.२ चे कशानेही न भरुन येणारे नुकसान होवून त्याला आपला बचाव करण्याची संधी मिळणार नाही. परंतु प्रतिवादी क्रं.२ ने आपली कैफियत मुदतीत दाखल केलेली नसल्यामुळे प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणून काही रक्कम प्रतिवादी क्रं.२ ने वादीस अदा करणेबाबत आदेश करणे न्यायोचित ठरेल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो .

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणून प्रतिवादी क्रं.२ ने वादीस रक्कम रु. २००/- अदा करावी.

(येणेप्रमाणे खुल्या न्यायालयात उद्घोषित).

Digitally signed by Aishwarya Sagar Jadhav
Date: 2022.02.14 17:14:46 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

**(श्रीमती. ए. एस. जाधव)**

दिनांक :- १४/०२/२०२२ ४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
इचलकरंजी इचलकरंजी.

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Orders are same, word to word, as per the original Judgment / Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | Shri. R. D. Jadhav |
| Name of Court | Sou. A. S. Jadhav,<br>$4^{th}$ Jt. Civil Judge Jr. Div., Ichalkarnaji. |
| Date of Dictation | 14/02/2022 |
| Order signed by P.O. on | 14/02/2022 |
| Order uploaded on | 14/02/2022 |